# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावरील स्थलांतरीत गावातील मालमत्तांना 'ब' सत्ताप्रकार लागु असल्याबाबत**

**(१) १९१८२ (१०-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील गोदावरी नदी काठावरील गावे स्थलांतरीत झाल्यामुळे या गावातील बहुतेक स्थावर मालमत्तेला ब सत्ता प्रकार लागु झाल्याचे व त्यामुळे सदर मिळकतीचे खरेदी-विक्रीचे व्यवहार होत नसल्याने “ब” सत्ता प्रकार रद्द करण्याबाबत मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, “ब” सत्ता प्रकार लागु केल्यामुळे सदर गावांतील मिळकतीचे व्यवहार करतांना शेतक-यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे ओह काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त गावांतील “ब” सत्ता प्रकारच्या मिळकतींचे 'अ' सत्ता प्रकारच्या मिळकतीमध्ये रुपांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०३-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

निफाड तालुक्यात एकंदर ३६ गावांचे नगर भूमापन झाले असून त्यातील १६७३ मिळकती “ब” सत्ताप्रकारच्या आहेत. “ब” सत्ता प्रकार मिळकतीबाबत, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर साठेखत/खरेदीखत व विषयांकित मिळकतीचे चालु वर्षाचे मूल्यांकन यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या रकमेवर ५०% ते ७५% अनर्जित उत्पन्नाची रक्कम वसूल करुन परवानगी दिली जाते.

(३) व (४) "ब" सत्ताप्रकारची मिळकत ही मूळ शासनाची मिळकत असल्याने “अ” सत्ताप्रकारात वर्गीकरण केले जात नाही. तसेच शासन निर्णय क्र.जमीन १०/२००८/प्र.क्र.१४६/ज-१, दिनांक २० जानेवारी, २००९ अन्वये चुकून लागलेल्या “ब” सत्ताप्रकारची नोंद कमी करणेबाबत तक्रार निवेदन प्राप्त झाल्यास त्यासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २०(२) अन्वये रितसर चौकशी करुन अशा जमिनीच्या अधिकार अभिलेखात नोंदण्यात आलेला “ब” सत्ताप्रकार वगळण्याबाबत अथवा यथास्थिती कायम ठेवण्याबाबत गुणवत्तेवर निर्णय घेऊन सुस्पष्ट आदेश पारित करण्याबाबतचे प्राधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे खाडीत होणारा अवैध रेती उपसा, अनधिकृत बांधकामे आणि धोकादायक इमारतींबाबत धोरण जाहिर करण्याबाबत

**(२) ३००५२ (२३-१२-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे खाडीत होणारा अवैध रेती उपसा तसेच जिल्ह्यात ठिकठिकाणी सुरु असलेली अनधिकृत बांधकामे आणि धोकादायक इमारतीबाबत लवकरच सर्वंकष धोरण जाहिर करण्याचा निर्णय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उपरोक्त धोरण लवकरात लवकर तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधिद्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम,१९८१ मध्ये “वाळू तस्कर” व “वाळूची तस्करी” या दोन संज्ञाचा समावेश करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दि.५/१२/२०१५ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीसंदर्भात सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी व गौणखनिज अनधिकृत उत्खनन/ वाहतूकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा स्तरावर महसूल विभाग, पोलीस विभाग व परिवहन विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात रेतीचे अनधिकृत उत्खनन/वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर विशेष दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांनी सन २०१५-१६ मध्ये गौणखनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या ९०८ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन

रु.१८७.३९ लक्ष एवढ्या रक्कमेची वसूली केली आहे. तसेच अवैध रेती उत्खनन प्रकरणी ८८ गुन्हे दाखल केले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सिंधी समाजाला शासनाने भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीबाबत**

**(३) ४५७१९ (२०-०४-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरातील व संपुर्ण राज्यातील २७ लाख सिंधी समाजातील नागरिकांना शासनाने काही जमिनी भाडेपट्टयाने दिल्या होत्या या भाडेपट्टाधारकांना मालकी हक्क देण्यात येईल असे आश्वासन राज्य शासनाने दिनांक १४ डिसेंबर,२०१५ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे अनेक वर्षापासून मालकी हक्क मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने शासननिर्णय काढण्याचे आश्वासन दिले होते परंतु अदयापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) फाळणीचे वेळी पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांना/ विस्थापितांना भरपाई संकोष मालमत्ता (Compensation pool properties) मधून देण्यात आलेल्या जमिनीच्या धारणाधिकाराचे स्वत:हून सर्वेक्षण करुन पुनर्विलोकन करण्याबाबत क्रमांक जमीन २०१५/प्र.क्र.२४०/ज-१, दिनांक १४.०६.२०१८ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने शेतक-यांना दिलेल्या जमिनीतील झाडे तोडण्यासाठी स्वामित्व शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

**(४) ४८०७० (२०-०४-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतक-यांना दिलेल्या जमिनीतील झाडे तोडण्यासाठी शासनाकडून स्वामित्व शुल्क घेण्यात येते मात्र शेतक-यांना शासनाने वाटप केलेल्या जमिनीत बहुतेक ठिकाणी झाडे असल्याने शेतकरी पेरणी करु शकत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झाडांची स्वामित्व शुल्काची रक्कम भरण्याइतकी परिस्थिती शेतकऱ्यांची नसल्याने शेतकरी झाडे तोडत नाही व शासनाने दिलेली जमीन पडून राहते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपूर्ण महाराष्ट्रात शासनाने शेतकऱ्यांना वाटप केलेल्या जमिनीत असलेल्या झाडांवर स्वामित्व शुल्क न आकारण्याबाबत मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांना वाटप केलेल्या जमिनीत असलेल्या झाडांवर रॉयल्टी न आकारण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१) व (२) अशी बाब नाही.

(३) या विषयाचे निवेदन दि.११/१२/२०१५ रोजी प्राप्त झाले आहे.

(४) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम २५ अंतर्गत झाडे तोडण्यासाठी रॉयल्टी घेण्याची तरतूद नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण ते शिळफाटा या उन्नत मार्गाचा विस्तार भिवंडीपर्यंत करण्याबाबत**

**(५) ७४४५३ (१२-०४-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-कल्याण-नवी मुंबई या मार्गावरील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा व्हावी या हेतूने कल्याण ते शिळफाटा या उन्नत मार्गाचा विस्तार भिवंडीपर्यंत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधीचा सुसाध्यता अभ्यास आणि प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उन्नत मार्गाच्या कामाला प्रत्यक्षात कधी सुरुवात करण्यात येणार आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही. तसेच या मार्गाचा विस्तार रस्त्याच्या मधून मेट्रो रेल्वे प्रकल्प जाणार असल्याने भिवंडीपर्यंत करण्याचा महामंडळाचा प्रस्ताव नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील रेती घाट ग्रामपंचायतींना चालविण्यासाठी देण्याबाबत**

**(६) ७५४३६ (१२-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील रेती घाट निर्धारीत दराने १० % वर्किंग कमिशनवर चालविण्याची मंजुरी ग्रामपंचायतीना देण्याबाबत मा.मंत्री, महसूल यांना दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार उक्त बाबीबाबत मंजुरी मिळाल्यास सर्वसामान्यांना निर्धारित दराने रेती उपलब्ध होऊन रेती चोरीचे प्रमाण कमी होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरण दि.३/१/२०१८ मध्ये संबंधीत गावाच्या ग्रामसभेने वाळू/रेती गटाच्या लिलावास सहमती दर्शविल्यास, त्या गावाच्या वाळूगटाच्या सर्वोच्च बोलीच्या रक्कमेमधून वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम वजा करुन, लिलावाची काही रक्कम संबंधीत ग्रामपंचायतीस प्रोत्साहनपर देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात महसूल विभागाच्या ताब्यात असलेली वनविभागाची जमीन परत देण्याबाबत**

**(७) ८१५४५ (१२-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील महसूल विभागाच्या ताब्यात असलेली वनविभागाची शेकडो एकर जमीन वनविभागाला परत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील वनविभागाची चार हजार एकर जमीन महसूल विभागाच्या ताब्यात असून सदर जमीन परत देण्याची कार्यवाही जिल्हा प्रशासनाने सुरु केली असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यवाही पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०८-२०१८) :** (१) होय, शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एस-१०/२०१६/प्र.क्र.४१३/फ-३, दि.०२.१२.२०१६ अन्वये महसूल विभागाकडे व्यवस्थापनासाठी जे राखीव, संरिक्षत वनक्षेत्र देण्यात आलेले होते ते वनविभागास हस्तांरित करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

(२) व (३) पुणे जिल्हयात महसूल विभागाकडे व्यवस्थापनासाठी देण्यात आलेले एकूण ४४,२४४.३५ हेक्टर वनक्षेत्र आहे. त्यापैकी महसूल विभागाने २४,१३६.७४ हेक्टर क्षेत्र वनखात्याकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. महसूल विभागाकडून वाटप करण्यात आलेले व अतिक्रमित क्षेत्र एकूण १४,०९६.६६ हेक्टर इतके असून ६०१०.९५ हेक्टर वन क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्याचे शिल्लक आहे. महसूल विभागाकडून वाटप करण्यात आलेल्या व अतिक्रमित असलेल्या वन क्षेत्राच्या दस्तदेवजांचा ताळमेळ घेवून निव्वळ हस्तांतरणासाठी उपलब्ध असलेले वन क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्याची कार्यवाही वन विभाग व जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयामार्फत संयुक्तपणे करण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कारंजा (जि. वाशिम) येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय व निवासस्थानाच्या बांधकाम प्रस्तावाला मंजुरी मिळण्याबाबत

**(८) ८१६०१ (१२-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि. वाशिम) येथील नवनिर्मित उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय व निवासस्थानाच्या बांधकाम प्रस्तावाला मंजुरी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री महसूल यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१) होय. असे पत्र महसूल व वन विभागाकडे प्राप्त झाले आहे.

(२) व (३) उपविभागीय अधिकारी, कारंजा यांच्या कार्यालय बांधकामाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येवून निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

## औरंगाबाद विभागात अधिका-यांच्या संगनमताने अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(९) ८९४९६ (१९-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागात विशेषतः औंरगाबाद, परभणी, नांदेड व लातुर या जिल्हयात महसुल व पोलीस प्रशासनातील अधिका-यांच्या संगनमताने वाळू माफिया मोठया प्रमाणात वाळूचा अवैध उपसा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे धनगर टाकळी, पिंपळगाव लिखा, देवठान (ता.पूर्णा, जि.परभणी) या गावांच्या परिसरात जेसीबी मशीन व सक्शन पंपाव्दारे वाळूचा बेकायदेशीर उपसा करून साठा केल्या जात असल्याचे व याकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार औरंगाबाद विभागात अवैध वाळू उपसा करुन साठा करणाऱ्या वाळू माफियांवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) सन २०१७-१८ मध्ये औरंगाबाद विभागातील ८ जिल्हयामध्ये एकूण ९९२ अवैध वाळूसाठे जप्त करण्यात आले असून त्यापैकी ७१४ वाळूसाठ्यांचा लिलाव अंतिम करण्यात येऊन त्यापासून रु.१६६४.४४ लक्ष इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे.

औरंगाबाद विभागातील प्रत्येक जिल्हयात जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर वेळोवेळी स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात येतात. तसेच दंडात्मक कारवाई करुन संबंधितांकडून दंडाची रक्कम वसूल करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महसूल विभागातील उपजिल्हाधिका-यांची १२५ पदे रिक्त असल्याबाबत

**(१०) ९२१३४ (१९-०८-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागातील १२० तहसिलदारांची सहा वर्षापासून पदोन्नती रखडल्याने उपजिल्हाधिका-यांची १२५ पदे रिक्त राहिली असल्याचे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे महत्वाच्या प्रकल्पाच्या भूसंपदानाची तसेच इतर अनेक कामे प्रलंबित झाली असून पर्यायी अधिकाऱ्यांवर त्याचा अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरची पदे पदोन्नतीने तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१), (२) व (३) उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गात पदोन्नतीमुळे व सेवानिवृत्तीमुळे होणारी संभाव्य रिक्त पदे विचारात घेऊन शासन आदेश दि.११.५.२०१८ अन्वये तहसीलदार संवर्गातून ४८ अधिकाऱ्यांना उपजिल्हाधिकारी संवर्गात तदर्थ/तात्पुरती पदोन्नती देण्यात आली असून महत्वाची रिक्त पदे भरण्यात आली आहेत
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौ.निरुखे कोलगाव (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील सर्व्हे क्र. ३१ व ३३ या मिळकतीतील अंतर्गत रस्ते व खुली जागा विकासकानी शासनाला हस्तांतरीत न केल्याबाबत.**

**(११) ९४९२२ (२१-०९-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा निरुखे कोलगाव (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील सर्व्हे क्र. ३१, हिस्सा नं. ७ क, सर्व्हे नं. ३१, हिस्सा नं. ९ अ, सर्व्हे नं.३३ हिस्सा नं. २६, २७, ३६ व ३७ या जमिनीस तहसिलदार, सावंतवाडी यांनी क्रमांक एनएपी/३४/एस/आर/६४६/२०१२, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या पत्रान्वये बिनशेती परवानगी दिली असून या मिळकतीतील अंतर्गत रस्ते व खुल्या जागा विकासकानी शासनाला हस्तांतरीत केल्या नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या मिळकतीमध्ये अनेक रहिवाशांचे प्लॉट असून या प्लॉटधारकांचा जाण्या-येण्याचा रस्ता बंद करण्यात आला असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी तहसिलदार, सावंतवाडी यांना योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असतानाही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करून मिळकतीतील अंतर्गत रस्ते विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०८-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे निरुखे कोलगाव (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील स.नं.३१ हि.नं.७ क, स.नं.३१ हि.स.९अ, स.नं.३३ हि.नं.२६, २७, ३६ व ३७ या जमिनीस तहसिलदार, सावंतवाडी यांच्या दिनांक २२/०२/२०१३ रोजीच्या पत्रान्वये बिनशेती परवानगी देण्यात आली आहे. मात्र सदर परवानगीनुसार अद्याप कोणत्याही घराचे बांधकाम अस्तित्वात नसल्याने जाण्या-येण्याचा रस्ता बंद होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर मिळकतीच्या सातबारा सदरी इतर हक्कात लिसपेंडन्सीचा शेरा असल्याने सदरचे क्षेत्र स्थानिक प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आले नव्हते दरम्यान उप विभागीय अधिकारी यांनी अपील सुनावणी आदेशान्वये इतर हक्कातील लिसपेंडन्सीच्या नोंदी रद्द केल्याने उक्त मिळकतीतील अंतर्गत रस्ते व खुले क्षेत्र स्थानिक प्राधिकरण (ग्रामपंचायत, कोलगाव) कडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

---

## अकोला जिल्हयातील गौण खनिज उत्खननाबाबत

**(१२) ९५३८२ (२१-१२-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात अवैध गौण खनिज उत्खननाची अनेक प्रकरणे गत पाच वर्षात निदर्शनास आली असून अकोट तालुक्यातील खदानीच्या मोजमापात तफावत आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खदानीचे मोजमाप केले असता सन २०१७ मध्ये केलेले मोजमाप सन २०१४ मध्ये केलेल्या मोजमापापेक्षा कमी आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोट तालुक्यातील खदानीच्या मोजमापात तफावत आढळून येण्याची कारणे काय तसेच अकोला जिल्हयात गत पाच वर्षात अवैध गौण खनिज उत्खननाची किती प्रकरणे निदर्शनास आली आहे,

(४) असल्यास, अकोला जिल्हयात गौण खनिज उत्खनन करणाऱ्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) अकोला जिल्हयामधील खदानीमधून उत्खनन केलेल्या गौण खनिजापासून प्राप्त स्वामित्वधनापेक्षा अधिक उत्खनन झाले किंवा कसे, याची तपासणी करण्यासाठी खनिकर्म संचालनालय यांचेमार्फत माहे सप्टेंबर, २०१७ पासून टप्प्या-टप्प्याने खदानींची मोजणी करण्यात आली आहे. अकोट तालुक्यामध्ये स्वामित्वधनाचा भरणा केल्यापेक्षा जास्त उत्खनन झाल्याची चार प्रकरणे निदर्शनास आली असून गौण खनिज अवैध उत्खनन प्रकरणी संबंधितांविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ नुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काळेवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील ग्रामस्थांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१३) ९६०६५ (२१-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळेवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील ग्रामस्थांना स्मशानभूमी अभावी रस्त्यावर अंत्यसंस्कार करावे लागत असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून काळेवाडी ग्रामस्थांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०८-२०१८) :** (१), (२) व (३) काळेवाडी (ता.कर्जत जि.रायगड) येथील ग्रामस्थांना स्मशानभूमी अभावी रस्त्यावर अंत्यसंस्कार करावे लागत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच सदर भागातून स्मशानभूमीसाठी जमिनीच्या मागणी संदर्भात कोणतेही निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही.

---

**मौजे आगाशी (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे क्र.२३३ हिस्सा क्र.१ या जागेचे बनावट खरेदीखत केल्याबाबत**

**(१४) ९६०७५ (२१-१२-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आगाशी (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे क्र.२३३ हिस्सा क्र.१ (जुना सर्व्हे क्र.२९१ पै.) या जागेचे मुळ मालक सन १९६९ मध्ये मयत झाले असताना आगाशी बारीवाडा येथील श्री.महेश भोईर यांनी जमिनीचे मुळ मालक जिवंत असल्याचे भासवून १३ मे, १९९६ रोजी बनावट कुलमुखत्यार पत्र तयार केल्याचे व मृत व्यक्तींच्या खोट्या सह्या करून बनावट खरेदीखत केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार मृत व्यक्तींच्या खोट्या सह्या करून बनावट खरेदीखत करणाऱ्या श्री.महेश भोईर व त्यास मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे आगाशी ता.वसई. जि.पालघर येथील स.नं. २३३/१/अ (जुना स.नं २९(१पै) ) क्षेत्र १-४६.१ हे.आर पैकी ०-७३.० हे.आर ही मिळकत श्री.महेश यशवंत भोईर यांनी बनावट खरेदीखताच्या आधारे नांवे करुन घेतल्याबाबतची तक्रार श्री.अनिकेत सतिश वाडीवकर व इतर यांनी विविध शासकीय कार्यालयाकडे दाखल केली होती. याबाबत उप विभागीय अधिकारी भिवंडी यांनी दिनांक ३०.०९.१९९८ च्या आदेशान्वये सदर खरेदीखताच्या अनुषंगाने झालेले फेरफार रद्द करुन मूळ खातेदारांची नांवे अभिलेखात पूर्ववत करण्यात आली आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी पालघर यांनी दि. ३१.०१.२०१८ च्या पत्रान्वये उप विभागीय अधिकारी, वसई यांना निर्देश दिले आहेत.

---

### वडनेर-चांदूर-हिंगणे गव्हाड-जिगाव (ता.नांदूरा, जि.बुलढाणा) या रस्त्यावर रेल्वेने रस्ता अनधिकृत असल्याचे फलक लावल्याबाबत

**(१५) ९८२७३ (२२-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडनेर-चांदूर-हिंगणे गव्हाड-जिगाव (ता.नांदूरा, जि.बुलढाणा) या पूर्णा नदीकाठच्या १० ते १२ गावांना तालुक्याशी तसेच राष्ट्रीय महामार्गाशी जोडणाऱ्या महत्वाच्या रस्त्यावर रेल्वे प्रशासनाने रस्ता अनधिकृत असल्याचे फलक लावल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा रस्ता अनधिकृत दाखविण्याची कारणे काय आहे ,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर रस्ता पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर रस्ता राज्य मार्ग क्र.२७७ असून रेल्वे प्रशासन सदर रस्त्याच्या दर्जाबाबत अनभिज्ञ असल्यामुळे, सदरचा रस्ता अनधिकृत दाखविण्यात आला होता. तथापि रेल्वे प्रशासनाला याबाबत सूचना केल्यानंतर लगेच सदर बॅनर काढण्यात आले आहेत.

(३) सदर रेल्वे प्रशासनाच्या पुलाचे दुरुस्तीचे काम सुरु असल्याने, रस्त्याच्या वाहतुकीकरीता तात्पुरता पर्यायी वळणमार्ग तयार करण्यात आलेला होता व त्यावरुन वाहतुक सुरु होती.

रेल्वे खात्यामार्फत सदर रेल्वे पुलाची दुरुस्ती माहे एप्रिल, २०१८ अखेर पूर्ण झाली असून, सद्य:स्थितीत रस्ता पुर्ववत करुन वाहतुक सुरळीतपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढुर्णा (ता.घाटंजी,जि.यवतमाळ) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१६) ९९०१३ (२१-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढुर्णा (ता.घाटंजी,जि.यवतमाळ) येथील रस्त्यांची दुरवस्था झाली असून रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेक छोटे-मोठे अपघात होऊन नागरिक जखमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) सदर रस्त्यावरील किमी २१५/४०० ते २२७/१०० हया लांबीमध्ये व्दिवार्षीक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत मंजुरी प्राप्त असून, त्यानुसार सदर रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण झाले असून, रस्ता वाहतुकीस योग्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजूरा येथील दिल्ली-चेन्नई रेल्वे मार्गावरील लेवल क्रॉसींग ९३ वर बांधण्यात येणाऱ्या रेल्वे उड्डाणपूलाबाबत**

**(१७) १०००४३ (०१-०१-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाम-चंद्रपूर आसिफाबाद मार्गावर राजूरा येथील दिल्ली - चेन्नई रेल्वे मार्गावरील लेवल क्रॉसींग ९३ वर बांधण्यात येणाऱ्या रेल्वे उड्डाणपूलाचे बांधकाम माहे जून, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाचे बांधकाम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे ही खेर आहे काय,

(३) असल्यास, सदर उड्डाणपूलाचे बांधकाम पूर्ण करण्यास विलंब करणाऱ्या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर उड्डाणपूलाचे बांधकाम कधी पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर उड्डाणपूलाचे काम मेसर्स अजय पाल मंगल ॲन्ड कंपनी ठाणे यांना दिनांक २९/०३/२०११ ला देण्यात आले असून काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने म्हणजे दिनांक २८/०३/२०१३ पर्यंत होता परंतु काम पूर्ण न झाल्याने कंत्राटदारास दंड आकारणी करण्यात आली आहे.

(४) सदर पुलाचे व पोच मार्गाचे बांधकाम करताना पूलाच्या खालील मातीची भरवाहन क्षमता आवश्यकतेपेक्षा कमी आढळून आल्याने पुलाचे व पोचमार्गाच्या पायव्याच्या संकल्पनेत बदल झाला. मंजूर करारनाम्यातील परिमाणामध्ये अतिरिक्त बाबींमुळे व प्राकलनामध्ये बदल झाल्याने प्रकल्पाचा संभावीत खर्च हा प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीच्या १० टक्के पेक्षा जास्त असल्याने शासन निर्णय दि.१०.०६.२०१८ अन्वये रु.२४.७१ कोटी रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर पुलाचे काम डिसेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## अमरावती बडनेरा या मिनी बायपास मार्गावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याबाबत

**(१८) १००१०८ (२१-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती बडनेरा या मिनी बायपास मार्गावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या मार्गाची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) अमरावती बडनेरा हा मिनी बायपास रस्ता राज्यमार्ग क्र.२९९, वरील कि.मी. ०/०० ते १२/५०० या लांबीमध्ये पडलेल्या खड्डयांच्या दुरुस्तीचे काम द्विवार्षीक योजने अंतर्गत मंजूर असून त्यानुसार खड्डे भरण्याचे काम दि.१५.१२.२०१७ पर्यंत पुर्ण करण्यात आले आहे व सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. रस्त्यावर पडणारे खड्डे वारंवार बुजविण्यात येत आहेत. सदर रस्ता हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत मंजूर असून, सदर कामाचे LOA देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली शहरातील नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये पसरलेल्या अस्वच्छतेबाबत

**(१९) १०१४२५ (२२-१२-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरात कोटयवधी रुपये खर्च करुन बांधलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये पसरलेल्या अस्वच्छतेमुळे कर्मचाऱ्यांच्या व याठिकाणी विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या जीवास धोका निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधीअभावी या नवीन प्रशासकीय इमारतीच्या स्वच्छतेचे काम बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन या इमारतीच्या स्वच्छतेच्या कामासाठी निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) व (३) या मध्यवर्ती इमारतीत २७ कार्यालये असून या इमारतीची देखभाल करण्यासाठी देखभाल समिती नेमण्यात आली आहे. या इमारतीतील सर्व कार्यालयांकडून त्यांच्या क्षेत्रफळाच्या प्रमाणात निधी प्राप्त झाल्यानंतर त्यातून वॉचमन, साफसफाई कर्मचारी, वीजबिलाची रक्कम, पाणीपट्टीचे बील इ. खर्च भागविण्यात येतो. सद्यस्थितीत या इमारतीची साफसफाई करण्याकरीता खाजगी व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली असून आठवड्यातुन ०२ वेळा स्वच्छता करुन घेतली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मिळकत पत्रिकेवरील क्षेत्रांची अंकी व अक्षरी नोंद करण्याबाबत**

**(२०) १०३०६४ (०१-०१-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे फाळणीतील निर्वासित लोकांना मोठ्या प्रमाणावर शासनाने आश्रय दिला असून त्यांना अद्यापपर्यंत राहत असलेल्या जमिनीचा ताबा दिलेला नसून नगर भूमापन अधिकारी उल्हासनगर-५ यांनी त्यांचे कडील पत्र दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ अन्वये त्यांच्या वरिष्ठांना मिळकत पत्रावरील क्षेत्रांची अंकी व अक्षरी नोंद करणे बाकी असलेल्या ५९२२ मिळकतीची पूर्तता करून घेण्यासाठी जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी ५ सदस्य समितीचे माहे नोव्हेंबर, २०१६ ला गठन करून शासनास ४ आठवड्यात अहवाल सादर करणार असून सदर अहवाल प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालाआधारे शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०८-२०१८) :** (१) व (२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे यांच्या दिनांक. ०८.११.२०१६ च्या आदेशान्वये उपसंचालक भूमि अभिलेख,

कोंकण प्रदेश मुंबई यांचे अध्यक्षतेखाली नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर यांच्या कार्यक्षेत्रातील मुळ नगर भूमापनाचे वेळेस तयार करण्यात आलेल्या नगर भूमापन अभिलेखात तांत्रिक/कायदेशीर त्रुटी व त्यावरील उपाय यांच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दिनांक २४.१०.२०१७ रोजी जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडे अहवाल सादर केला. सदर समितीने उल्हासनगर येथील फाळणीतील निर्वासित लोकांच्या नगर भूमापन मिळकतीमधील त्रुटी दुर करण्यासाठी जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, ठाणे व नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर यांना कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा अहवाल उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडून पुढील कार्यवाहीसाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख यांच्याकडे सादर करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**कांबा वाघेरापाडा (ता.कल्याण,जि.ठाणे) येथील आदिवासी शेतक-यांच्या जमिनी बळकावल्याबाबत**

**(२१) १०४११८ (२२-१२-२०१७). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांबा वाघेरापाडा (ता.कल्याण,जि.ठाणे) येथील आदिवासी शेतक-यांच्या जमिनी बळकावून त्यावर अनधिकृतपणे खोदकाम व बांधकाम करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तक्रारीनंतर प्रथम आकारण्यात आलेला ५३ हजार रुपये दंड तब्बल २८ लाखांपर्यंत वाढल्याने अधिका-यांच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधीत दोषी भूमाफिया व अधिकारी यांच्यावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कांबा, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ४७/१अ व इतर या मिळकतीमधून कसूरदार यांनी २०० ब्रास मातीचे अनधिकृत उत्खनन केल्याबद्दल तहसिलदार, कल्याण यांनी दिनांक ३०/१०/२०१० च्या आदेशान्वये रुपये १,६७,८००/-एवढा दंड आकारला होता.

तद्‌नंतर याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करुन उक्त मिळकतीमधून कसूरदार यांनी ११८७ ब्रास माती आणि ३९१ ब्रास दगडाचे अनधिकृत उत्खनन केल्याबद्दल तहसिलदार, कल्याण यांनी दिनांक ०९/०८/२०११ रोजी रुपये २२,०९,२००/- इतक्या दंडाचे आदेश पारीत केले.

सदर आदेशाविरुध्द कसुरदार यांनी दाखल केलेल्या अपिलात उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दिनांक १२/१२/२०११ च्या आदेशान्वये तहसिलदार यांचे उक्त आदेश रद्द

करुन कसुरदार यांच्याकडून ११८७ ब्रास माती आणि ३९१ ब्रास दगडाचे अनधिकृत उत्खनन केल्याबद्दल स्वामित्वधन रुपये ३,१५,६००/- व दंड रुपये २४,६९,५४३/- तसेच भूपृष्ठ भाडे रुपये ६०,५४७/- असे एकूण रुपये २८,४५,६९०/- शासन जमा करण्याचे आदेश केले. सदर आदेशानुसार कसुरदार यांनी दिनांक १९/१०/२०१२ रोजी सदर रक्कम शासन जमा केली आहे.

---

## राज्यातील टोलनाक्यावरील पिवळ्या पट्ट्याबाहेरील वाहनांना टोल न आकारण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२२) १०४७७९ (२७-०३-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोल नाक्यावरील वाहतूककोंडी टाळण्यासाठी टोलपासून विशिष्ट अंतरावर आखण्यात आलेल्या पिवळ्या पट्टीच्या बाहेरील वाहनांना टोल न घेता सोडून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कोणताही आदेश किंवा परिपत्रक न काढल्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व टोल नाक्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली असून वाहन चालक व टोल नाक्यावरील कर्मचारी यांच्यामध्ये वाद विवादाच्या घटना घडत आहे तसेच टोल नाक्यांवर वाहन नेमके कुठे उभे आहे हे पाहण्याची यंत्रणा नसल्यामुळे सदर निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त निर्णयाबाबतचे परिपत्रक किंवा आदेश तातडीने काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) यासंदर्भातील राज्यातील टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तसेच पिवळ्या पट्टीच्या बाहेरील वाहनांकडून टोल घेणे किंवा कसे यासंदर्भात निर्णय घेण्याकरीता उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली दि. ०६-०४-२०१८ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची प्राथमिक बैठक दि. २५-०४-२०१८ रोजी झाली. बैठकीमध्ये आय आय टी, मुंबई यांचे तज्ञ व्यापक अभ्यास करुन ६ महिन्यांमध्ये अहवाल सादर करतील व त्यानंतर निविदेतील तरतुदीस अधीन राहून, कायदेतज्ञ आपले अभिप्राय देतील अस निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त होताच यासंदर्भातील केंद्र शासनाचे प्रचलित नियम व निकष, करारनाम्यातील तरतुदी व कायदेशीर व तांत्रिक बाबी तपासून पुढील कार्यवाही करता येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाबाबत**

**(२३) १०४८१७ (२७-०३-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर या शहरांमधील ७१० कि.मी. लांबीचा प्रवास ६ तासात पूर्ण करण्यासाठी समृध्दी महामार्गाचे ३ वर्षात बांधकाम करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार अद्यापपर्यंत महामार्गाचे किती बांधकाम झाले आहे तसेच भिवंडी-कसारा पर्यंतच्या या महामार्गासाठी कंत्राटदार मिळत नसल्याने महामार्गाबाबतच्या काही अटी व शर्ती शिथील करण्याचा निर्णय राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महामार्गासाठी कंत्राटदार न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, यासर्व प्रकरणी चौकशी करून उक्त महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) अद्याप, नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) बांधकाम सुरु झालेले नाही. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.
RFQ मध्ये Tunnel व Viaduct साठीचा पात्रता निकष प्रचलित NAHI / MoRTH / CVC च्या मार्गदर्शक तत्वानुसार ठेवण्यात आलेला होता.

मात्र महामार्गाच्या काही भागासाठी (कन्स्ट्रक्शन पॅकेज १४, १५ व १६- पिंप्रीसद्रोद्दीन ता. ईगतपुरी जि. नाशिक ते आमने ता. भिवंडी जि. ठाणे) पहिल्या RFQ प्रक्रियेमध्ये दिलेल्या पात्रता निकषानुसार पुरेशा कंत्राटदारांचा प्रतिसाद मिळत नसल्याने RFQ मध्ये Tunnel व Viaduct साठी पात्रता निकषाच्या अटी व शर्ती शिथिल करण्याचा निर्णय महाराष्ट्र ज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला असून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुर्ला येथील शिवसृष्टी, पेस्तम सागर इत्यादी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाबाबत

**(२४) १०५४९६ (२७-०३-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (मुंबई उपनगर) येथे महसूल विभागाने भाडेपट्ट्याने/कब्जे हक्काने दिलेल्या शासकीय जमिनीवरील शिवसृष्टी, पेस्तम सागर व इतर सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी शासन निर्णयानुसार रेडी रेकनरच्या २५ टक्के अधिमुल्य आणि सदनिका नावे करण्याकरिता ५००/- रुपये प्रती चौ.फुट शासनाकडे भरणा करावा अशी अट महसूल विभागाने या सोसायट्यांमधील रहिवाशांना घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या सोसायट्यांमधील रहिवाश्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्यामुळे याप्रकरणी बैठक घेऊन संयुक्तीक व न्याय निर्णय शासनाने घ्यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास व तत्पूर्वी अनेकदा लेखी पत्र देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणी उचित निर्णय घेऊन या इमारतीतील नागरिकांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) महसूल विभागाच्या शासन निर्णय क्र. जमीन २५१२ /०७ /प्र.क्र.३०/ज-२ दि. १३ एप्रिल,२०१७ अन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३९(९) व ३३(१०) हे विनिमय वगळत अन्य विनियमाअंतर्गत पुनर्विकासाच्या प्रकरणात परवानगी देतांना निवासी/वाणिज्यिक/औद्योगिक प्रयोजनासाठी संबंधीत शासकीय जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दराने येणाऱ्या बाजारमुल्याच्या २५% दराने व शैक्षणिक/धर्मादाय प्रयोजनासाठी संबंधीत जमिनीच्या अशा बाजारमूल्याच्या १२.५% अशा दराने अधिमूल्य आकारण्याबाबत धोरणात्मक निदेश देण्यात आले आहेत.

सदर धोरणात शासन निर्णय दि.२३ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सुधारणा करण्यात आली असून ज्याठिकाणी पुनर्विकास करतांना सर्वसाधारणपणे मूळ चटईक्षेत्र निर्देशांकाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या बांधकामापेक्षा वाढीव बांधकाम करण्यासाठी खुल्या बाजारातून हस्तांतरणीय विकास हक्क विकत घ्यावे लागत असतील किंवा अधिमूल्य भरून वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक प्राप्त करून घ्यावे लागत असेल त्याठिकाणी बृहन्मुंबईत वरील प्रमाणे पुनर्विकासाच्या प्रकरणात परवानगी देतांना निवासी/ वाणिज्यिक/औद्योगिक प्रयोजनासाठी संबंधीत शासकीय जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दराने येणाऱ्या किंमतीच्या १०% दराने व शैक्षणिक/धर्मादाय प्रयोजनासाठी पुनर्विकासासाठी अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दराने येणाऱ्या किंमतीच्या ५% दराने अधिमूल्य आकारण्याबाबत धोरणात्मक निदेश देण्यात आले आहेत.

तसेच, शासन निर्णय क्र. जमीन-२०१७/प्र.क्र.१२७/ ज-१ दि. ०७ जुलै, २०१७ अन्वये मुंबई उपनगर जिल्ह्यातील प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतीमधील सदनिका हस्तांतरणाचे दर ज्या संस्थेचा पुर्णत्वाचा दाखला मिळाल्यापासून अनुक्रमे ५/१०/१५ वर्षे पुर्ण झाली आहेत. त्यांच्या बाबत अनुक्रमे किमान रक्कम रू. ५००/-, ३००/-, २००/- प्रती चौ. फूट या प्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासन निर्णय दि. ४ मे, २०१८ अन्वये अधिक स्पष्टीकरण देखील देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) उपविभागीय कार्यालय इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(२५) १०५७४१ (२७-०३-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) उपविभागीय अधिकारी, कार्यालयाच्या इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १३ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यते अभावी शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर अंदाजपत्रकांची छाननी करताना उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याची पूर्तता करुन नस्ती तांत्रिक मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास दि.२२/०२/२०१८ रोजी पुनश्च सादर करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे."
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल,जि.रायगड) येथील प्रशासकीय भवनाच्या कामाबाबत**

**(२६) १०६२४९ (२७-०३-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील प्रशासकीय भवनाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत संपूर्ण काम पूर्ण होणे अपेक्षित असताना उर्वरित काम निधी अभावी रखडले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त प्रशासकीय भवनाच्या इमारतीचे काम तातडीने पूर्ण होण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात यत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०७-२०१८) :** (१), (२) व (३) पनवेल, जि.रायगड येथील तहसिल कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या रु. ९८१.८० लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून आतापर्यंत संपूर्ण रक्कम वितरित करण्यात आली आहे. ही इमारत पूर्ण होण्यासाठी अधिक रकमेची आवश्यकता असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे. सदर कामासाठी निधी वितरीत करण्याच्या दृष्टीने वर्ष २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात लाक्षणिक तरतूद ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे नूल-मुगळी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील रस्त्यालगतच्या विहिरीचा संरक्षक कठडा तुटल्याबाबत

**(२७) १०७२४९ (०६-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नूल-मुगळी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील रस्त्यालगतच्या असलेल्या विहिरीचा संरक्षक कठडा तुटला असल्याने विहीरीत पडुन अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहिरीला संरक्षक भिंत तातडीने बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक ८ जानेवारी,२०१८ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनानुसार सदर विहिरीला संरक्षक भिंत तात्काळ बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
प्रश्नांकीत भडगाव-जरळी मुगळी नूल खनदाळ नांगनूर हा रस्ता प्रजिमा क्र. ५६ असा आहे. या रस्त्यालगतच्या विहीरीची संरक्षक भिंत अतिवृष्टीमुळे खचल्याने रस्त्यावरील वाहतूकीस अडथळा निर्माण झाला होता.
(३) सद्य:स्थितीत संरक्षण भिंतीच्या भागात संरक्षक दगड/डेलिनेटर बसवून खडी व मुरमाच्या सहाय्याने रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांना टोल माफी देण्याबाबत**

**(२८) १०८०४७ (२७-०३-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील पत्रकार व वृत्तपत्र छायाचित्रकार यांना अनेक वेळा वृत्त संकलनाकरिता स्थानिक पातळीसह संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्रकार व वृत्तपत्र छायाचित्रकार यांना प्रवासादरम्यान टोल माफी देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक १ जून २०१५ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील सर्व पथकर स्थानकांवर व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अखत्यारितील २६ पथकर स्थानकांवर कार, जीप व इतर तत्सम हलकी वाहने, एस.टी. व स्कूल बसेस यांना पथकरातून सूट देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील बहुतांश पत्रकार व छायाचित्रकार कार, जीप व इतर तत्सम हलकी वाहनांचा उपयोग करीत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकर स्थानकावर पथकर वसुली करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) मतदारसंघातील नवीन चावडी इमारतींची कामे प्रलंबीत असल्याबाबत**

**(२९) १०८७८७ (२७-०३-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) या डोंगरी आणि दुर्गम विधानसभा मतदारसंघामधील तलाठी सज्जा असणाऱ्या अनेक गावांमध्ये स्वंतत्र अशी तलाठी कार्यालये नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटण मतदारसंघातील नविन चावडी इमारतींच्या कामांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून पाटण मतदारसंघातील स्वतंत्र तलाठी सज्जा असलेल्या गावांमध्ये नविन चावडी इमारती उभारण्याकरीता निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) मा. लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पाटण, जि.सातारा येथील २० तलाठी कार्यालयांसाठी नविन इमारतींचे बांधकाम करण्याबाबत मा. राज्यमंत्री (महसूल) यांना विनंती केली असून विभागीय आयुक्त, पुणे यांच्या दि.२९/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पाटण, जि. सातारा येथील २० तलाठी कार्यालयांसाठी नविन इमारतींचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने सदर २० तलाठी कार्यालय बांधकामाची स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करुन शासनास सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### समृध्दी महामार्गाला जमिनी देण्यास शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध

**(३०) १०८९५७ (२७-०३-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गासाठी जमिन संपादनाची प्रक्रिया चालू असताना जमिनीला अधिक दर मिळण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात काही अधिकारी व शेतकऱ्यांनी विवीध ठिकाणच्या शेतात पोल्ट्री फॉर्मचे कच्चे रोड उभारुन शासनाची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांगरी पेडगाव (ता.मंगरुळपीर, जि.वाशीम) परिसरात सावकाराकडे खरेदी खत करुन गहाण ठेवलेल्या शेतीचे समृध्दी महामार्गासाठी भूसंपादन झाले असल्याणे याचा मोबदला सावकारांना मिळणार असल्याचे तसेच या महामार्गासाठी कासगाव, भिवंडी येथील एका वृध्द स्त्रीला विश्वासात न घेता त्यांच्या शेतजमिनीचे खरेदी खत केल्याने त्या वृध्द स्त्री उपोषणास बसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महामार्गासाठी खर्डी जवळील दळखण (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील श्रीमती सावित्रीबाई बळीराम कदम या ९० वर्षीय महिलेच्या मालकी हक्काच्या सर्व्हे व गट क्र. २२४ (ब) मधील १ एकर २६ गुंठे जमिन संपादित करण्यात आली असून सदर जमिनीचा मोबदला त्यांना अद्याप न मिळाल्याने त्यांनी तहसिलदार, शहापूर यांच्याकडे आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून जमिनीचे मूल्यांकन वाढविण्यासाठी संगनमत करून शासनाची फसवणूक करणाऱ्या अधिकारी व शेतकऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच पांगरी पेडगाव परिसरातील समृद्धी महामार्गात गेलेल्या जमिनींचा मोबदला सावकारांना न मिळता शेतकऱ्याना देण्याबाबत तसेच श्रीमती सावित्रीबाई बळीराम कदम यांना त्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८)** : (१) नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील १६ शेतकऱ्यांनी शेतात नवीन बांधकाम, नवीन विहिरी, झाडे व शेड उभारल्याचे जानेवारी २०१८ च्या सुमारास निदर्शनास आले आहे. मात्र सदर शेतकऱ्यांच्या जमिनी थेट खरेदी प्रक्रीयेद्वारे खरेदी करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे मोबदला वाटप करण्यात आला नाही. त्यापैकी मौजे दातली, ता.सिन्नर येथील एका शेतकऱ्यानी नव्याने उभारलेली झाडे व शेड वगळून जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला त्यांना अदा करण्यात आला आहे.
(२) मौजे पांगरी, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम येथील एकूण १० शेतकऱ्यांपैकी ८ शेतकऱ्यांच्या जमिनी अधिकार अभिलेख व ताबा वहिवाट याची खात्री करुन खाजगीवाटाघाटीद्वारे थेट खरेदी करण्यात आल्या असून त्याचा मोबदला अदा करण्यात आला आहे.

मौजे पेडगांव, ता.मंगरुळपीर, जि.वाशिम येथील एकूण ७२ शेतकऱ्यांपैकी ६९ शेतकऱ्यांच्या जमिनी अधिकार अभिलेख व ताबा वहिवाट याची खात्री करुन खाजगीवाटाघाटीद्वारे थेट खरेदी करण्यात आल्या असून त्याचा मेबदला अदा करण्यात आला आहे.

मौजे कासगांव, ता.भिवंडी येथील सर्व्हे नं. १४८ क्षेत्र ०.३८.४ हे.आर. ही जमीन श्री.गजानान गोपाल गोरले यांच्या मालकीची असल्याने दि.११.०९.२०१७ रोजी खरेदी करण्यात आली आहे. त्याच दिवशी श्रीमती चांगुणाबाई गोरले यांनी सदर जमीन त्यांना ७५ वर्षांपूर्वी तोंडी जबाबाने देण्यात आली असून सदर जमीन त्यांच्या ताब्यात असल्याने त्यांना मोबदला मिळावा अशी हरकत घेतली आहे. उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी सुनावणी घेऊन हरकत अर्ज फेटाळला आहे. हरकतदार श्रीमती चांगुणाबाई गोरले उपोषणाला बसल्या नाहीत.

(३) मौजे दळखण, ता.शहापूर, जि.ठाणे येथील शेतकरी श्रीमती सावित्रीबाई बळीराम कदम यांच्या जमीन खरेदीच्या मोबदल्यात दि.०२.०२.२०१८ रोजी मोबदला अदा करण्यात आला आहे.
(४) नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गाच्या आखणीमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी विहित पध्दतीने खरेदी करण्यात आल्या असून त्याचा सुयोग्य मोबदला अदा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आकारी पडीत जमीन मूळ मालकांना परत वाटप करण्याबाबत**

**(३१) १०९१६२ (२७-०३-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आकारी पडीत जमीन मूळ मालकांना परत वाटप करण्याबाबत सन २०१५ मध्ये तत्कालीन महसूल मंत्री महोदय यांनी आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबत काही धोरण निश्चीत केले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्यातील आकारी पडीत जमीन मुळ मालकांना परत वाटप करण्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-१८२ मध्ये सन २०१६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.२७, दिनांक २२.०८.२०१६ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्या नुसार “महाराष्ट्र जमीन महसूल (जप्त केलेली आणि जिल्हाधिकारी यांच्या व्यवस्थेखाली आणलेली स्थावर मालमत्ता परत करणे) नियम, २०१७ दिनांक ०१ जानेवारी, २०१८ च्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इंजिनीअरिंग कॉलेज, नागपूर येथील विद्युतीकरणाच्य कामाच्या निविदेतील गैरव्यवहार**

**(३२) १०९२४८ (२७-०३-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंजिनीअरिंग कॉलेज, नागपूर येथील विद्युतीकरणाच्या कामाच्या निविदेबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी चौकशी करणेबाबत अधिक्षक अभियंता, सा.बां. प्रादेशिक (विद्युत) मंडळ, पुणे यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०८-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर कामातील निष्काळजीपणाबाबत जबाबदार असलेल्या संबंधित सहायक अभियंता (विद्युत) श्रेणी-२ यांच्याविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**महागांव (जि.यवतमाळ ) येथील तुळजापूर ते बुटीबोरी मार्गाच्या नूतनीकरणाच्या कामाबाबत**

**(३३) १०९३४६ (२७-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) येथील तुळजापूर ते बुटीबोरी मार्गाच्या नूतनीकरणासाठी लागणारे गौण खनिज उत्खनन करण्यासाठी २२ वर्ष जुन्या क्रशरला परवानगी नाकारुन अहमदाबाद (गुजरात) येथील सदभाव इन्फ्रस्ट्रक्चर या कंपनीला उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आल्यामुळे स्थानिक मजुरावर स्थलांतर करण्याची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गौण खनिज उत्खननाची परवानगी सदभाव इन्फ्रास्टक्चर या कंपनीला देण्याची कारणे काय आहे, तसेच यास जबाबदारअसणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करून मजूरांचे स्थलांतर रोखण्याबाबत शासनाने कोणणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०८-२०१८) :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ या वारंगा-महागाव रस्त्याच्या कामाकरीता जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या कार्यालयामार्फत सद्भाव इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला मौजे उमरखेड खंड-१, ता.उमरखेड, जि.यवतमाळ येथील शासकीय गट नं.२६/१ पैकी ४.५० हे.आर जमीनीवर ७५० ब्रास गौण खनिज उत्खननाचे तात्पुरते परवाने मंजूर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अंधेरी आरटीओ कार्यालयाच्या जागेतील ७०० झोपडीधारक कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३४) १०९६६६ (२७-०३-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी आरटीओ कार्यालयाच्या जागेत ७०० झोपडीधारक कुटुंबे राहत असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांनी सन २०१५ मध्ये अहवाल सादर होऊनही विकासकाबरोबर झालेला करार रद्द न केल्यामुळे त्यांना एसआरए योजनेद्वारे होणा-या पुनर्वसनापासून वंचित रहावे लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ मध्ये त्याबाबतचा अहवाल सादर केला असताना अद्यापी विकासकासोबतचा करार रद्द न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त करार त्वरीत रद्द करुन येथील झोपडीधारक कुटुंबांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०६-२०१८) :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकासकासोबतचा करारनामा रद्द करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर असल्याबाबतचे शपथपत्र मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.१५.०२.२०१८ रोजी सादर करण्यात आले आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) यांचे आदेश दि.१९.०६.२०१७ व या आदेशास ॲपेक्स ग्रीव्हन्सेस रिड्रेसल कमिटी यांनी दि.२८.११.२०१७ रोजी पुष्टी केल्याप्रमाणे एस.आर.ऐ.ने. विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (१०) अंतर्गत विकासकाशी केलेला करारनामा रद्द केला आहे. तसेच अशा पध्दतीने करारनामा संपुष्टात आल्याने विकासकाचा शासनाच्या जागेवरील अधिकार संपुष्टात आलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा करारनामा रद्द न झाल्यामुळे एस.आर.ऐ. योजनेद्वारा होणाऱ्या पुनर्वसनापासून झोपडपट्टीधारक कुटुंबे वंचित राहत आहेत, असे म्हणणे योग्य नसून, विकासकाच्या अकार्यक्षमता व दिरंगाईमुळे प्रकल्प पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. त्याअनुषंगाने एस.आर.ऐ.ने विकासकावर कार्यवाही केलेली आहे.

(२) विकासकाने त्यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केला असल्यामुळे शासनामार्फत विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (१४) अंतर्गत विकासकाशी केलेला करारनामा रद्द करण्याची प्रक्रीया करण्यात येत आहे.

(३) सदर प्रकल्पातून मे.के.एस.चमणकर यांची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे रद्द करण्यात आलेली आहे व शिखर तक्रार निवारण समितीने शिक्कामोर्तब केले आहे. तसेच संस्था स्तरावर नवीन विकासक नेमण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तथापि, मे.के.एस.चमणकर यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केल्याने प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजुरा (जि.चंद्रपूर) येथील जाम-चंद्रपुर-आसिफाबाद मार्गावर असलेल्या रेल्वे क्रोसिंग ९६ वर सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामाबाबत**

**(३५) ११०४७१ (१९-०४-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथील जाम-चंद्रपुर-आसिफाबाद मार्गावर रेल्वे क्रोसिंग ९६ वर सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामास दिनांक २० मार्च, २०१० रोजी वा त्या सुमारास ७१.०० कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामावर अद्यापपर्यंत रूपये १८.६९ कोटी इतकी रक्कम खर्च होउनसुद्धा काम पुर्ण न झाल्याने रूपये २४.५३ कोटीच्या सुधारीत अंदाजपत्रकासह काम पुर्ण करणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उड्डाणपूलाचे बांधकाम अद्यापही पुर्ण झालेले नसल्याने विलंब करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर कामास रू. १७.०० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

(२) होय.

प्रकल्पाचा संभावित खर्च हा प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीच्या १०% पेक्षा जास्त झाल्याने रू.२४७१.८२ लक्ष रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही सुरू असुन आजतागायत रू.२१,४१,५००/- दंड वसुल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर ग्रामीण मतदार संघातील मंजूर व प्रस्तावित कामांची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३६) १११४० (२७-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील लातूर ग्रामीण मतदार संघातील नोव्हेंबर, २०१४ ते आजतागायत शासनाच्या तालुकास्तरीय विविध विभागातील मंजूर व प्रस्तावित कामांची माहिती संकलित करून देण्याबाबत लातूर ग्रामीण लोकप्रतिनिधीनी तहसीलदार औसा, रेणापूर व लातूर यांच्याकडे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही त्याबाबत माहिती देण्यात आलेली नाही आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०८-२०१८) :**(१) होय.
(२) व (३) मा.लोकप्रतिनिधींना (i) तहसिलदार, औसा यांनी कृषि विभाग वगळता इतर सर्व विभागांची माहिती दि.०५/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून दिली आहे. (ii) तहसिलदार, रेणापूर यांनी दि.२४/११/२०१७ रोजीच्या मा.आमदार महोदयांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत माहितीचे बुकलेट उपलब्ध करुन दिले आहे. व (iii) तहसिलदार, लातूर यांनी १२ यंत्रणांची माहिती दि.२०/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली असून उर्वरीत २३ यंत्रणांची माहिती प्राप्त होताच संकलीत करून देण्यात येणार असल्याचे उक्त पत्रान्वये कळविले आहे.

---

## वाशिम जिल्हयातील रस्ते दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत

**(३७) १११५२१ (२७-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील रस्त्यावर पडलेले खडडे बुजविण्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे काही काळातच पुन्हा रस्त्यांना खडडे पडून रस्ता वाहतुकीस धोकादायक झाल्याने वाहन चालक व नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरहू रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्ता दुरुस्तीचे निकृष्ट दर्जाचे काम करणा-या कंत्राटदार तसेच संबधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०८-२०१८) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे. अवजड वाहतुकीमुळे रस्त्यावर खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) वाशिम जिल्हयातील रस्त्यावर पडलेले खड्डे डिसेंबर, २०१७ अखेर बी.बी.एम ने भरुन पुर्ण करण्यात आले होते. त्यावरील कारपेट सिलकोटची कामे जानेवारी, २०१८ दरम्यान प्रगतीत होती. आता कारपेट सिलकोटची कामे झालेली आहेत. रस्त्यावरील खड्डे भरण्याकरिता व्दिवार्षिक पध्दतीचे करारनामे करण्यात आलेले असून खड्डे पडल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत कंत्राटदाराकडून भरुन घेतले जातात. सद्य:स्थितीत रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने सुस्थितीत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेळघाटातील धारणी (जि. अमरावती) तालुक्यातील रेतीच्या तस्करीबाबत

**(३८) १११८४१ (०४-०४-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील नदी-नाल्यामध्ये दररोज मध्यरात्री व पहाटेच्या वेळी रेतीची तस्करी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेती लिलावाची मुदत संपली असली तरीही सदर तस्करी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यातील संबंधीत रेती तस्करांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सन २०१७-१८ मध्ये धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील वाळूघाट लिलावात गेलेले नाहीत. तलाठी व महसूल कर्मचारी यांनी घातलेल्या गस्तीमध्ये माहे डिसेंबर,२०१७ मध्ये वाळूचे अनधिकृत उत्खनन होत असल्याची बाब निदर्शसनास आली आहे.
गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी तालुकास्तरावर पथके स्थापन करण्यात आली आहेत.

धारणी तालुक्यात दि.१/१२/२०१७ ते १३/१२/२०१७ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या १४ प्रकरणात १३ वाहने व १ जेसीबी जप्त करण्यात येऊन रु.२४,२३,०००/- इतक्या रक्कमेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाबाबत

**(३९) ११३५३८ (२७-०३-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी आवश्यक असलेल्या खोपोली एक्झिट ते कुसगाव या भागातील १२ किलोमीटर लांबीच्या वनविभागाच्या जागेबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने त्रुटी असलेला प्रस्ताव पाठविला असल्याने रस्ताचे काम रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाणे चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकचे योग्य प्रस्ताव पाठवून नवीन रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पासाठीचा वनक्षेत्र वळतीकरण प्रस्ताव दि.२९.०५.२०१७ रोजी ऑनलाईन सादर करण्यात आला. त्याअनुषंगाने उप वनसंरक्षक रायगड व पुणे यांच्यावतीने अनुक्रमे दि.१४.०६.२०१७ व दि.११.१०.२०१७ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या) या कार्यालयातील अधिकाऱ्यांसह स्थळ पाहणी (site inspection) करण्यात आली असून सद्य:स्थितीत उप वनसंरक्षक रायगड व पुणे यांच्या स्तरावर प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील शिवाजीनगर गोदाम येथे सामान्य नागरिकांकडून पैसे घेऊन गैरमार्गाने विविध दाखले देण्यात येत असल्याबाबत**

**(४०) ११३५६३ (२७-०३-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील शिवाजीनगर गोदाम येथे सामान्य नागरिकांकडून पैसे घेऊन गैरमार्गाने विविध दाखले देण्याचे काम एजंट करीत असल्याचे तसेच मामलेदार कचेरी येथे वकीलच एजंट असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शिवाजीनगर गोदाम व मामलेदार कचेरी येथे दाखल्यांसाठी सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक थांबविण्यासाठी तसेच येथील एजंटना पायबंद घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०७-२०१८) :** (१), (२) व (३) याबाबत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही, मात्र कांही अनोळखी व्यक्ती दाखल्यांच्या कामांसाठी येणाऱ्या नागरीकांची दिशाभूल करीत असलेबाबत नागरिकांच्या तोंडी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर प्रकरणी तहसिल कार्यालयाकडून चौकशी करुन कार्यवाही करण्यात आली आहे.

शिवाजीनगर गोदाम येथे पुणे शहर तसेच हवेली तालुक्याचे नागरी सुविधा केंद्र असून त्याच ठिकाणी अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय आहे. तसेच मामलेदार कचेरी हवेली व पुणे शहर येथे नगर भूमापन कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, वन विभागाचे कार्यालय व खडकमाळ आळी पोलीस चौकी अशी कार्यालये आहेत. सदर ठिकाणी अनोळखी व्यक्ती, स्टॅम्प व्हेंडर, नोटरी, अर्ज लिहून देणारे तसेच वकिल यांचेकडून अनधिकृतपणे जागेवर अतिक्रमण करण्यात आलेले होते. याबाबत तहसिलदार, हवेली व तहसिलदार, पुणे शहर यांनी संयुक्त कार्यवाही करुन नागरिकांची होणारी फसवणूक थांबविण्यासाठी तसेच अनोळखी व्यक्तींवर पायबंद घालण्यासाठी सदर ठिकाणचे अतिक्रमण काढून त्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे.

शिवाजीनगर गोदाम व मामलेदर कचेरी येथे दाखल्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक होवू नये यासाठी कार्यालयातील एका कमचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. वरील दोन्ही ठिकाणी अनोळखी व्यक्ती व वकिल यांचेकडून अनधिकृत अतिक्रमण व वावर होणार नाही यांची दक्षता घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आरवली (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील जमिनीच्या ७/१२ वर बेकायदेशीर कुळ लावल्याबाबत**

**(४१) ११४१९० (२७-०३-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरवली (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे काही दशकापूर्वी घर नसलेल्यांना जमीन मालकांनी तोंडी व्यवहाराद्वारे घर बांधण्यासाठी जागा दिली असता संबंधितानी या जागेसह आजुबाजुची जागा बळकावण्यासाठी ७/१२ वर बेकायदेशीर कुळ लावून घेतले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जमिनीच्या ७/१२ वर बेकायदेशीरित्या नोंदी करण्याचा प्रकार चालू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त होत असलेल्या बेकायदेशीर प्रकारांना आळा घालावा अशी मागणी संबंधित जमीन मालकांनी तहलिसदारांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०८-२०१८) :** (१), (२) व (३) असे निदर्शनास आले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वर'एअर ॲम्बुलन्स' सेवा सुरु करण्याबाबत**

**(४२) ११४६६१ (२७-०३-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वर सातत्याने होणा-या अपघातातील गंभीर जखमींना तात्काळ वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने 'एअर ॲम्बुलन्स' सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) व (२) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर होणाऱ्या अपघातातील गंभीर जखमींना तात्काळ उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत पुढाकार घेऊन मौजे ओझर्डे, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे. त्यासाठी उपकरणाकरीता आर्थिक तरतुद करणे व ऑपरेटींग एजन्सीची नियुक्ती विनाशुल्क तत्वावर करण्याची बाब अंतिम टप्प्यात आहे. सदर ट्रॉमा केअर सेंटर सोबत "एअर ॲम्बुलन्स" सेवा सुरु करण्यासाठी पुरेशी निधीची तरतूद नसल्याने त्याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयातील गोदावरी नदी पात्रातून होत असलेला वाळूचा अवैध उपसा

**(४३) ११५३०२ (२७-०३-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील गोदावरी नदी पात्रातून अहोरात्र मोठया प्रमाणात वाळू उपसा करून करण्यात येत असलेल्या वाळूच्या वाहतुकीकडे नायगाव तालुक्यातील महसुल व पोलीस अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त नदीपात्रातून करण्यात येणारा वाळू उपसा व वाळूच्या वाहतूकीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई कली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) नांदेड जिल्हयातील नायगाव तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकामार्फत तालुक्यात गस्त घालण्यात येत असून गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

नायगाव तालुक्यात दि.१ एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी,२०१८ अखेर गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या ७४ प्रकरणांमध्ये दंडात्मक कार्यवाही करुन रुपये २६,११,२७४/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खंडाळा (जि.सातारा) येथील शिरवळ-लोणंद रस्त्यासाठी संपादित जमिनीच्या जाहीर केलेल्या निवाड्यात अनेक खातेदारांची नावे नसल्याबाबत**

**(४४) ११५५३७ (०१-०४-२०१८). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खंडाळा (जि. सातारा) येथील शिरवळ-लोणंद रस्त्यासाठी संपादित जमिनीच्या जाहीर केलेल्या निवाड्यात अनेक खातेदारांची नावे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या या बेजबाबदार कारभारामुळे अंदोरी गावातील सुमारे ३० प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष जमिनी आणि घरे देऊनही भरपाई मिळणार नसल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांची नावे निवाड्यात घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१८) :** (१) शिरवळ-लोणंद-फलटण-बारामती या रस्त्यासाठी ता. खंडाळा, जि. सातारा येथील जमिनी संपादित करण्यात आल्या असून याबाबतचे अंतिम निवाडे हे उपअधीक्षक, खंडाळा यांनी भूसंपादन कामी दिलेले संयुक्त मोजणी प्रमाणपत्र व संयुक्त मोजणी नकाशे याआधारे तयार करण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांत उल्लेखित अधिकार अभिलेख (७/१२) मध्ये नमूद असलेल्या खातेदारांची नावे अंतिम निवाड्यात नमूद करण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

अंदोरी गावचा अंतिम निवाडा हा दि. १/७/२०१७ रोजी जाहीर करण्यात आलेला असून सदर भूसंपादन प्रस्तावातील संयुक्त मोजणी नकाशामध्ये नमूद असलेल्या गटांचा व क्षेत्राचा अंतिम निवाड्यात समावेश करण्यात आलेला आहे. त्यात नमूद असलेल्या खातेदारांना अधिकार अभिलेख (७/१२) वरून नुकसान भरपाई अदा करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) भूसंपादनाचे अंतिम निवाडे जाहीर केल्यानंतर त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, सातारा यांना नाहीत. संयुक्त मोजणी प्रमाणपत्र व संयुक्त मोजणी नकाशा यात समाविष्ट नसलेल्या जमिनींचे प्रत्यक्षात संपादन होत असल्यास त्याबाबत नवीन भूसंपादन प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे १ यांनी सादर केल्यास त्यावर भूसंपादन कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा माहिती अधिकारी, सातारा यांच्यामार्फत दि. २०/२/२०१८ रोजी प्रसिद्धीपत्रक (प्रेस नोट) देऊन खातेदारांना भूसंपादनाबाबत काही हरकती असल्यास त्या दाखल करण्याबाबत संधी देण्यात आली आहे.

---

**इंदापूर-तळा-मांदाड (जि.रत्नागिरी) या रस्त्यासाठी संपादि त केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(४५) ११६२१५ (२८-०३-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर-तळा-मांदाड (जि.रत्नागिरी) या ४३ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या दुपदरीकरण करून रस्ता चौदा मिटर रुंद करण्यासाठी सन १९९४ मध्ये भूसंपादन करण्यात आले असून त्याचा मोबदला अद्यापी संबंधिताना देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधिताना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील फ्लाय ओव्हर ब्रिजची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४६) ११६२४० (२७-०३-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील रेल्वे स्टेशनच्या उत्तर दिशेच्या बाजूला असलेला व पूर्व आणि पश्चिम भागास जोडणाऱ्या फ्लाय ओव्हर ब्रिजच्या पश्चिमेकडील जिन्याचा कठडा माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निखळून पडल्यामुळे जिवीत व वित्त हानी होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पूलाच्या दुरुस्तीसाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर उड्डाणपुलाच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत नियुक्त कंत्राटदाराकडून सदर निखळून पडलेल्या कठड्याच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साई (ता.पनवेल जि.रायगड) येथील आर्शिया कंपनी शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यास रस्ता देत नसल्याबाबत

**(४७) ११६२४१ (२८-०३-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साई (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आर्शिया या कंपनीने तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या असून कंपनीच्या आजूबाजूला तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीमध्ये जाण्यासाठी या कंपनीच्या बाजूने मार्ग असून तो मार्ग या कंपनीने बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून सुद्धा सदर कंपनी स्थानिक शेतकऱ्यांना रस्ता खुला करुन देत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून या कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०६-२०१८) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर रस्त्याबाबत तहसिलदार, पनवेल यांचे कडे दाखल दाव्यात दिनांक ११.०७.२०१३ चे आदेशान्वये रस्ता खुला करण्याबाबत आदेश पारित करण्यात आले होते. सदर आदेशाविरुध्द आर्शिया टेक्नालॉजीस इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीने उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडे दाखल केलेल्या अपिलामध्ये तहसिलदार, पनवेल यांचे उक्त नमूद आदेश कायम करण्यात आले. या आदेशा विरुध्द सदर कंपनीने मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले असता, मा.उच्च न्यायालयाने उप विभागीय अधिकारी यांचे आदेशास “स्थगिती” दिली असल्याने शेतकऱ्यांच्या जमिनीकडे जाणारा मार्ग बंद आहे. सदर न्यायालयीन प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे ते पौड आणि मुळशी मार्ग तमानीकडे जाणाऱ्या रस्त्याची तसेच मुळा नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) ११६५०९ (०१-०६-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे ते पौड आणि मुळशी मार्गे तमानीकडे जाणाऱ्या रस्त्यावर ठीक ठिकाणी खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघाताच्या संख्येमध्ये वाढ झाली असल्याचे तसेच या अपघातामध्ये जीवित व वित्त हानी होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावरील मालेफाटा ते शेदानी भागाला जोडणारा संभवे येथील मुळा नदीवरील पूल हा परिसरातील ३० ते ३५ गावांसाठी महत्वाचा असून या पुलाची दूरवस्था झाल्यामुळे पूल कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची व तसे घडल्यास या गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुणे ते पौड आणि मुळशी मार्गे तमानीकडे जाणाऱ्या रस्त्याची तसेच मुळा नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्नांकीत पुणे पौड-मुळशी कोलाड रस्ता प्रमुख राज्यमार्ग ५ असा आहे. सदर रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले असून सद्य:स्थितीस रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे. हा रस्ता रा.म. ७५३ (एफ) असा घोषित झाला असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रस्त्याच्या नवीन कामाची निविदा प्रक्रिया कार्यवाही झाली आहे. तसेच संभवे येथील मुळा नदीवरील पुलाची प्राथमिक तपासणी मार्ग प्रकल्प विभाग पुणे यांनी केली आहे. तपासणी अहवालानुसार सद्य:स्थितीत पुल सुरक्षित असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदवड-विंचूर (रामा क्र.७) या रस्त्याच्या कामाचा समावेश हायब्रीड ॲन्युटी योजनेमध्ये करण्याबाबत

**(४९) ११७४७६ (२०-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदवड-विंचूर (रामा क्र.७) या रस्त्याच्या कामाचा समावेश हायब्रीड ॲन्युटी योजनेमध्ये करण्याकरिता डीपीआर बनविण्यासाठी दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यारंभ आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचा हायब्रीड ॲन्युटी याजनेमध्ये समावेश करून रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०८-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) रस्त्याच्या कि.मी.१७४/६०० ते १८९/६०० या लांबीतील मजबुतीकरणाचे काम हायब्रीड ॲन्युईटी योजने ऐवजी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात मंजूर झाल्याने, सदर कामाची निविदा प्रक्रिया राबवून कार्यारंभ आदेश देवून त्वरित काम सुरु करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) या गावाला पाणीपुरवठा करणारी विहिर समृध्दी महामार्गात गेल्याबाबत**

**(५०) ११८८९१ (२०-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती ) हे तालुक्यातील सर्वात मोठे गाव असून या ४२२४ लोकसंख्या असणाऱ्या गावाला पाणीपुरवठा करणारी विहिर समृध्दी महामार्गात गेल्याने पाणीटंचाई निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावकऱ्यांनी सदर बाब जिल्हाधिकारी, कार्यालय अमरावती यांच्या निदर्शनास आणुन दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर गावाला पाणीपुरवठा करणारी सदर विहिर समृध्दी माहामर्गातुन वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मौजे मंगरूळ चव्हाळा, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती या गावाला पाणी पुरवठा करणारी विहीर ही श्री.राम रुपवार शिरभाते व इतर ५ यांच्या खाजगी जमिनीमध्ये असून सदर जमीन महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या आखणीमध्ये समाविष्ट आहे. सद्य:स्थितीत या विहिरीवरुन मंगरूळ चव्हाळा गावाकरीता पाणीपुरवठा सुरु असल्यामुळे गावाला पाणी टंचाई निर्माण झालेली नाही.
(२) खरे आहे.
(३) मौजे मंगरूळ चव्हाळा, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथील श्री.राम रूपवार शिरभाते व इतर ५ यांनी महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या आखणीमध्ये समाविष्ट त्यांची खाजगी जमीन त्यामधील विहिरीसह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास नोंदणीकृत खरेदीखताव्दारे खरेदी दिलेली आहे.
तथापि, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी दि.२०.०४.२०१८ च्या पत्रान्वये मौजे मंगरूळ चव्हाळा या गावाच्या पाणीपुरवठ्याबाबत पर्यायी उपाययोजना करण्याबाबत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.